admn 18-19


# महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद,

(महाराष्ट्र कृषी विद्यापीठ अधिनियम, १९८३ मधील कलम १२ नुसार स्थापित)

आयएस्ओ १००१ : २००८ मानांकित संस्था

१३२/ब, भांबुर्डा, भोसलेनगर, पुणे - ४११ ००७.

MCAER कृषि परिषद

ई-मेल : edn_mcaer@rediffmail.com

संकेतस्थळ : www.mcaer.org

दूरध्वनी (०२०) २५५३ ७६८८.

फॅक्स (०२०) २५५३ ३७६४.


जा.क्र. मकृप/शिक्षण-१/२०९६

दि.१४ सप्टेंबर,२०१८

## परिपत्रक

**विषयः- चारही कृषी विद्यापीठांतर्गत व्यावसायिक पदवी अभ्यासक्रमाच्या वाढीव प्रवेश कार्यक्रमाबाबत.**

राज्यातील चारही कृषी विद्यापीठांतर्गत व्यावसायिक पदवी अभ्यासक्रमाची सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षातील प्रवेश प्रक्रिया राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्षाच्या नियंत्रणाखाली नियोजित वेळापत्रकानुसार दि. ३०/८/२०१८ रोजी पूर्ण करण्यात आलेली आहे.

तथापि, इ. १२ वी (विज्ञान) ची पुरवणी परीक्षा उत्तीर्ण झालेल्या व पदवी प्रवेश माहिती पुस्तिका २०१८-१९ मधील पात्रता धारण करणाऱ्या उमेदवारांना प्रवेशाची संधी देणे, भारतीय कृषी अनुसंधान परिषदेच्या सामायिक प्रवेश परीक्षा दिलेले उमेदवारांना प्रवेशाची संधी देणे, व्यावसायिक पदवी अभ्यासक्रमांमध्ये केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेंतर्गत सध्या रिक्त असलेल्या जागा, कायमस्वरूपी विना अनुदानित महाविद्यालयातील व्यवस्थापन कोटयातील रिक्त जागा केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेंतर्गत हस्तांतरित करण्याची महाविद्यालयांना संधी उपलब्ध करणे इत्यादी बाबी विचारात घेऊन विहित मुदतीत प्रवेश प्रक्रिया राबविण्यास राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्षाने मान्यता दिलेली आहे.

यास्तव चारही कृषी विद्यापीठांतर्गत बी.एस्सी. (ऑनर्स) (कृषी), बी.एस्सी. (ऑनर्स) (उद्यानविद्या), बी.एस्सी. (ऑनर्स) (वनविद्या), बी. टेक्. (कृषी अभियांत्रिकी), बी. टेक्. (अन्नतंत्रज्ञान), बी. एस्सी. (ऑनर्स) (सामाजिक विज्ञान), बी. टेक. (जैवतंत्रज्ञान) आणि बी.एफ्.एस्सी. (मत्स्यविज्ञान) हया व्यावसायिक पदवी अभ्यासक्रमामध्ये प्रवेशासाठी खालीलप्रमाणे महाविद्यालयस्तरावर वाढीव प्रवेश कार्यक्रम राबविण्यात येत आहे.

| अ. क्र. | तपशील | दिनांक |
|---|---|---|
| १ | व्यावसायिक पदवी अभ्यासक्रमाच्या महाविद्यालयांमध्ये रिक्त असलेल्या जागांच्या तपशिलाची प्रसिध्दी | १६/०९/२०१८ |
| २ | ज्या कायमस्वरूपी विना अनुदानित महाविद्यालयास संस्थास्तरीय रिक्त जागा केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेसाठी वर्ग करावयाच्या आहेत, त्यांनी लेखी स्वरूपात कृषी परिषद कार्यालयाकडे विनंती पत्र ई-मेलद्वारे edn mcaer@rediffmail.com या ई-मेल पत्त्यावर पाठविण्याचा कालावधी. | १६/०९/२०१८ ते १८/०९/२०१८ |

admn 18-19

| अ. क्र. | तपशील | दिनांक |
|---|---|---|
| ३ | जे प्रवेशोच्छुक उमेदवार दि. २३/०७/२०१८ रोजी प्रसिध्द केलेल्या अंतिम गुणवत्ता यादीमध्ये (सदरची यादी संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आलेली आहे) समाविष्ट नाहीत, अशा उमेदवारांनी संकेतस्थळावर ऑनलाईन प्रवेश अर्ज दाखल करण्याचा कालावधी. | १७/०९/२०१८ ते १९/०९/२०१८ |
| ४ | नव्याने प्राप्त झालेल्या प्रवेश अर्जांची यादी. | २०/०९/२०१८ |
| ५ | संस्थास्तरीय कोटयातून केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेकडे वर्ग केलेल्या जागांसह रिक्त जागांच्या तपशिलाची प्रसिध्दी. | २१/०९/२०१८ |
| ६ | राज्यातील चारही कृषी विद्यापीठांतर्गत व्यावसायिक पदवी अभ्यासक्रमांतर्गत रिक्त असलेल्या जागांकरिता महाविद्यालयस्तरावर **'जागेवर प्रवेश फेरी'**. | |
| | (अ) गुणवत्ता यादीमधील संबंधित शाखेतील ६० टक्के व त्यापेक्षा अधिक गुण असलेले उमेदवार | २३/९/२०१८ |
| | (ब) गुणवत्ता यादीमधील सर्व पात्र उमेदवार (जागांच्या रूपांतरासह) | २४/९/२०१८ |
| ७ | संस्थास्तरीय कोटयातील रिक्त जागा संबंधित महाविद्यालयस्तरावर भरण्याचा अंतिम दिनांक | २५/०९/२०१८ **(दुपारी ३.०० पर्यंत)** |

**प्रवेश कार्यक्रमाबाबत महत्वाच्या बाबी खालीलप्रमाणे आहेत.**

१. जे उमेदवार राज्यातील कृषी विद्यापीठांतर्गत व्यावसायिक पदवी अभ्यासक्रमाच्या पहिल्या वर्षात प्रवेशित आहेत, असे उमेदवार या प्रवेश कार्यक्रमामध्ये समाविष्ट होण्यास पात्र नाहीत.

२. दि. २३/०७/२०१८ रोजी प्रसिध्द झालेल्या गुणवत्ता यादीमध्ये ज्या उमेदवारांची नावे आहेत, अशा उमेदवारांनी पुन्हा नव्याने अर्ज दाखल करू नयेत.

३. वरील अ.क्र.१ व २ येथील उमेदवार वगळता पदवी प्रवेश माहिती पुस्तिका २०१८-१९ मध्ये नमूद केलेली पात्रता धारण करणाऱ्या उमेदवारांनी, त्यांना योग्य तो प्रवर्ग, गुण, आरक्षणाचा लाभ मिळण्यासाठी, पदवी प्रवेश माहिती पुस्तिका २०१८-१९ मध्ये नमूद केलेली मूळ कागदपत्रे उमेदवाराकडे असणे आवश्यक आहे. अशा कागदपत्रांची शहानिशा करूनच उमेदवारांनी ऑनलाईन प्रवेश अर्जामध्ये माहिती भरावी व संबंधित कागदपत्रे अपलोड करावीत.

४. उमेदवाराने प्रवेश अर्जामध्ये भरलेल्या माहितीची तपासणी न करता उमेदवाराचा यादीमध्ये समावेश करण्यात येईल व जागेवरील प्रवेश फेरीचे वेळी संबंधित महाविद्यालयाकडून अशा मूळ कागदपत्रांची तपासणी करूनच प्रवेश निश्चित करण्यात येईल, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

५. संकेस्थळावर रिक्त जागांचा तपशील उपलब्ध असेल. अशा रिक्त जागा विचारात घेऊन उमेदवारास ज्या महाविद्यालयात प्रवेश घ्यावयाचा आहे, त्या महाविद्यालयात उमेदवाराने मूळ कागदपत्रे, आवश्यक त्या शुल्कासह वर नमूद केलेल्या दिनांकास सकाळी ९.०० वाजता उपस्थित रहावे.

६. संवैधानिक आरक्षित जागांवर प्रवेशाकरिता जात पडताळणी प्रमाणपत्र अनिवार्य असेल.

७. महाविद्यालयांनी प्रवेश देतेवेळी पदवी प्रवेश माहिती पुस्तिकेतील जागेवरील प्रवेश फेरीविषयी 'परिशिष्ट जे' मध्ये नमूद केलेली कार्यपध्दती अवलंबवावी.

८. जागेवरील प्रवेश फेरीद्वारे महाविद्यालयस्तरावर दिलेल्या प्रवेशासंदर्भात जागा स्वीकृती शुल्क म्हणून रू.१०००/- संबंधित महाविद्यालयांनी प्राप्त करावे व सदरची रक्कम STATE CET CELL AGRI MS MUMBAI यांचे भारतीय स्टेट बँक, मुंबई मुख्य शाखा येथील खाते क्र. ३७७१८३९१००८, IFSC Code SBIN0000300 या खात्यावर त्वरीत जमा करावी. याबाबतची पावती कृषी परिषद कार्यालयास सत्वर सादर करावी.

९. वरील प्रवेश प्रक्रिया http://www.dtemaharashtra.gov.in / http://www.mcaer.org / maha-agriadmission.in या संकेतस्थळावर उपलब्ध असेल.

(सचिन्द्र प्रताप सिंग)
**महासंचालक तथा**
**सदस्य, प्रवेश नियामक प्राधिकरण**

प्रतः-

१. मे. कल्प टेक्नॉलॉजीज प्रा.लि., तिसरा मजला, गोपाळ हाऊस, हॉटेल किमयाजवळ, कर्वे रोड, कोथरुड, पुणे ४११ ०२९.
यांना सूचित करण्यात येते की, अंतिम गुणवत्ता यादीतील उमेदवारांना सदर परिपत्रकाच्या संकेतस्थळावरील उपलब्धतेबाबत भ्रमणध्वनी संदेश पाठवावेत.

२. मे. जे. डीन. सॉफ्ट, आरएच-७, प्लॉट क्र. ६१, सेक्टर क्र. १६, पीसीएनटीडीए, चिखली, पुणे
यांना सूचित करण्यात येते की, त्यांनी सदरच्या परिपत्रकास संकेतस्थळावर प्रसिध्दी द्यावी.

३. आयुक्त, राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष, ८ वा मजला, न्यु एक्सेसर बिल्डींग, ए. के. नायक मार्ग, फोर्ट, मुंबई ४००००१.
यांना विनंती करण्यात येते की, ज्या उमेदवारांनी राज्य सामायिक प्रवेश परीक्षा दिलेली आहे, अशा उमेदवारांना सदर प्रक्रियेसंदर्भात अवगत होण्याच्या दृष्टिकोनातून भ्रमणध्वनी संदेश पाठविण्याबाबत संबंधितांना योग्य ते आदेश व्हावेत. तसेच मे. कल्प टेक्नॉलॉजीज प्रा.लि., पुणे यांना सदरची प्रवेश प्रक्रिया राबविण्याविषयी योग्य ते आदेश व्हावेत.

४. कुलसचिव, महात्मा फुले कृषी विद्यापीठ,राहुरी, जि.अहमदनगर / डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला / वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी / डॉ.बाळासाहेब सावंत कोंकण कृषी विद्यापीठ, दापोली जि.रत्नागिरी
यांना सूचित करण्यात येते की, सदर परिपत्रक कृषी विद्यापीठांच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावे. तसेच उक्त प्रवेश प्रक्रिया राबविण्यासाठी राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्षाने दिलेल्या सूचनानुसार प्रवेश प्रक्रिया निरीक्षक नियुक्त करावा. प्रवेश परीक्षा निरीक्षकाने प्रवेश प्रक्रियेचा अहवाल महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषदेकडे सादर करावा.